<u>परिपत्रक</u>

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/आ./२०१६/3887
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक:-०४/०६/२०१६

<u>वाचा</u> :-

१) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक एसपीई-२०१२/(१०८/१२)/साशि-१,दि. ३१ ऑक्टोबर २०१३

२) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन शुध्दीपत्र क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.-११६ एसडी-२,दि. ३० सप्टेंबर २०१५

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या मार्फत दरवर्षातून दोन वेळा शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा घेण्यात येते. तथापि महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन शुध्दीपत्र क्रमांक संकीर्ण - २०१५/प्र.क्र.११६/एसडी-२,दि. ३० सप्टेंबर २०१५. मध्ये मॅन्युअल टायपिंगची शेवटची परीक्षा **"दि. ३१ मे २०१६ पर्यंत"** असेल **"या पुढे मुदतवाढ दिली जाणार नाही "** असे नमूद आहे.

जीसीसी परीक्षा जून २०१६ नंतरच्या सत्रासाठी मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रमास कोणत्याही संस्थेने विद्यार्थ्यास प्रवेश देण्यात येवू नये. नियमबाहय प्रवेश दिल्यास त्या विद्यार्थ्याची परीक्षा घेण्याची जबाबदारी परीक्षा परिषदेची राहणार नाही.

जून -२०१६ नंतर मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रमास प्रवेश दिल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी ज्या त्या टंकलेखन संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

(आर.व्ही.गोधने)
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-१.**